॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २०(प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखा अभ्यास प्रशाळेतील योगशास्त्र विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी बी. ए. लिबरल आर्ट्स (योगशास्त्र), एम. ए. योगशास्त्र तसेच डिप्लोमा इन योगा टीचर या अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन व ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने राबविण्यात येणारे हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच रोजगार व स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देणारे ठरत आहेत.

योगशास्त्र विभागात सुरू करण्यात आलेला बी. ए. लिबरल आर्ट्स (योगशास्त्र) हा इयत्ता बारावीनंतरचा चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम असून, अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना ऑनर्स पदवी प्रदान केली जाणार आहे. तसेच एम. ए. योगशास्त्र हा दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम कोणत्याही शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असून, योगशास्त्र क्षेत्रात उच्च शिक्षण घेण्याची आणि संशोधन क्षेत्रात प्रगती करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. योगशास्त्रातील सैद्धांतिक व प्रायोगिक ज्ञानासोबतच आधुनिक आरोग्य व्यवस्थापन, योग चिकित्सा आणि संशोधन पद्धतींचे प्रशिक्षण या अभ्यासक्रमाद्वारे दिले जाते.

योगशास्त्र विभागाचे हे सर्व अभ्यासक्रम रोजगाराभिमुख स्वरूपाचे असून, विद्यार्थ्यांसाठी योग शिक्षक, योग प्रशिक्षक, कॉर्पोरेट वेलनेस सल्लागार, फिटनेस व हेल्थ कोच, योग थेरपिस्ट, संशोधक, क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ, उच्च शिक्षण क्षेत्रातील अध्यापक तसेच स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या विविध संधी उपलब्ध करून देतात. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत आरोग्य व मानसिक स्वास्थ्याला वाढते महत्त्व प्राप्त होत असल्याने योगशास्त्र क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळाची मागणी देशासह परदेशातही वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्रात करिअरच्या व्यापक संधी निर्माण होत आहेत.

प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी योगशास्त्र विभागाशी संपर्क साधावा. योगशास्त्र क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन योगशास्त्र विभागप्रमुख इंजि. राजेश पाटील तसेच आंतरविद्याशाखा अभ्यास प्रशाळेच्या संचालिका प्रा. मनीषा इंदानी यांनी केले आहे.

........................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २० जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता